महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२६/५५७ दिनांक : 20 JUL 2026

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ :- १)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/Intake Approval/२०२६/४२६, दि.१७.६.२०२६
२)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/Intake Approval/२०२६/४७२, दि.३०.६.२०२६
३)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/Intake Approval/२०२६/५१५, दि.०९.७.२०२६

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली अशा शिखर परिषदांव्दारे मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरू आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेतील पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार विद्यापीठांची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करून दि.०३.०७.२०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन क्र.१ च्या परिपत्रकान्वये निर्देशित करण्यात आले होते. तथापि, ब-याच संस्थांची माहिती अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्याने संदर्भाधीन क्र.२ व ३ च्या परिपत्रकान्वये अनुक्रमे दि.१०.०७.२०२६ व दि.१५.०७.२०२६ पर्यंत माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अद्यापही बऱ्याच संस्थांची माहिती अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांची संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती व त्याअनुषंगीक इतर माहिती अद्ययावत करुन दि.२२ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर सादर करावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रिये दरम्यान जागा वाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य / संचालक जबाबदार राहतील.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर -
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.२२/०७/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. अध्यक्ष / सचिव, सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

४. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.